# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक** २००७/(३२२/०७)विशि–४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४ चा महा. ३५)
या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**(विद्या विभाग )**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५ फोन:०७१३२ – २१६५५४, २२३१०४,२२३३२३

जा.क्र/गोविग/विद्या/ ५३५ /२०१६ दिंनाक : ३१/०८/२०१६

# अधिसूचना

सर्व संबधितांच्या माहिती करिता सूचीत करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाद्वारे निर्गमित अधिसूचना क्र. गोविग/विद्या/४३९/२०१६ दिंनाक २२/०८/२०१६ नुसार संचालीत महाविद्यालय, शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालय सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची अंतीम तिथी दिंनाक ३१ ऑगष्ट २०१६ करण्यात आलेली होती.

मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुबई यांचे पत्र क्र. संकीर्ण –२०१६/प्र.क्र.(४८२/१६)/विशि–३, दिंनाक २६/०८/२०१६ चे पत्रान्वये विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये या करिता सन २०१६–१७ या वर्षापासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परिक्षेच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्याची पुरवणी परिक्षा संप्टेबर–ऑक्टोबर ऐवजी जुलै–ऑगष्ट मध्ये घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला. त्याअनुषंगाने इयत्ता १२ वी साठीच्या घेण्यात आलेल्या पुरवणी परिक्षेचा निकाल दि. २४/०८/२०१६ रोजी प्रसिध्द झाला आहे. सदर पुरवणी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी शासनाचे निर्देशानुसार **विद्यापीठाद्वारे फक्त पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दि. १०/०९/२०१६ पर्यत वाढविण्यात येत आहे.**

सदर मुदतवाढ ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केन्द्रीय प्रवेश समितीद्वारे केले जातात त्यांना लागू राहणार नाही. निर्धारीत प्रवेश क्षमतेतील रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

**मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये,**

**डॉ. श्रीराम रोकडे**
कुलसचिव (प्रभारी),
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित :**

१. मा. कुलगुरु महोदयाचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. परिक्षा नियत्रंक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. सर्व अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. प्राचार्य सर्व संलग्नित व संचालित महाविद्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.